खबरदारी

# गुलाबी बोंडअळीच्या बंदोबस्तासाठी डोमकळ्यांची ओळख महत्त्वाची




प्रा.डॉ. एस. टी. आघाव
डॉ. सी. एस. पाटील
प्रा.डॉ. उदय पवार
(संशोधन सहयोगी)
(मो.नं. ७७५७०५३१२७)
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर


कपाशीला फुले व बोंडे लागण्यास सुरवात झालेली आहे. अशा परिस्थितीत पिकावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव होतो. गुलाबी बोंडअळीची मादी उमलत असलेल्या फुलांच्या खालच्या बाजूने एकेरी अंडी घालते. त्यातून दोन ते तीन दिवसांत अळ्या बाहेर पडतात व उमलणाऱ्या फुलांमध्ये प्रवेश करतात. अशी प्रादुर्भावित फुले गळून पडतात. त्यापासून बोंडे तयार झाल्यास अळी आत राहून बोंड पोखरते त्यामुळे मोठे नुकसान होते. त्याकरिता सुरवातीलाच डोमकळी ओळखून तिचे नियंत्रण करणे आवश्यक असते.

**डोमकळी** : अंड्यातून बाहेर पडलेली गुलाबी बोंड अळी प्राथमिक अवस्थेत पांढऱ्या रंगाची असून डोके तपकिरी रंगाचे असते. ही अळी फुलामध्ये प्रवेश करते. त्यानंतर लाळेच्या सहाय्याने फुलाच्या पाकळ्यांना आतून एकमेकांत गुंफून घेते व फुलातील परागकण खाते. प्रादुर्भावग्रस्त फूल अर्धवट उमललेल्या गुलाबाच्या कळीसारखे दिसते. अशा कळीस डोमकळी असे म्हणतात.




गुलाबी बोंड अळीने तयार केलेली डोमकळी



फुलात शिरलेली गुलाबी बोंड अळी



अळी फुलातील परागकण खातांना




गुलाबी बोंड अळीने कापसाच्या बोंडाचे केलेले नुकसान

**डोमकळी अशी ओळखावी** : डोमकळ्या तोडून पाकळ्यांना वेगळे केल्यास, पाकळ्या अळीच्या लाळेद्वारे एकमेकांस चिकटलेल्या दिसतात. बारकाईने निरीक्षण केल्यास पांढरट रंगाची पहिल्या किंवा दुसऱ्या अवस्थेतील गुलाबी बोंडअळी आतमध्ये असल्याचे दिसून येते.

### डोमकळ्या वाढण्याची कारणे

१. कपाशीची लवकर लागवड – सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यामुळे काही शेतकरी बंधू उन्हाळ्यात अर्थात एप्रिल – मे महिन्यात कपाशीची लागवड करतात. त्यामुळे या कपाशीला जवळपास ४५ दिवसांनंतर फुले लागतात. अशा फुलांमध्ये सुरवातीला गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव सुरु होतो. अंड्यातून निघालेली अळी ताबडतोब कळ्या, फुले यांना छिद्र करून आत शिरते. प्रादुर्भावग्रस्त फुलाचे डोमकळीत रुपांतर करते. या उन्हाळी कपाशीवरील डोमकळ्या वेळीच नष्ट न केल्यास यातील गुलाबी बोंडअळीची दुसरी पिढी तयार होऊन प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढू शकतो. २. कपाशीचा खोडवा किंवा फर्दड क्षेत्रात होणारी वाढ. ३. कपाशीच्या लागवडीसाठी उपलब्ध असलेले– विविध वैशिष्ट्ये असलेले विपुल संकरित वाण. ४. जास्त कालावधीच्या संकरित वाणांची लागवड. ५. योग्य वेळी गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनाचा अभाव.

**डोमकळ्यांचे नियंत्रण**: १. डोमकळी ओळखणे शेतमजुरांना अवगत करून देऊन पीक ९० दिवसांचे होईपर्यंत जास्तीत जास्त डोमकळ्या गोळा करून आतील अळीसह नष्ट कराव्यात. २. कपाशीचा खोडवा/ फर्दड घेऊ नये. ३. उन्हाळी कपाशीची लागवड टाळावी. ४. ट्रायकोग्रामाटॉयडिया बॅक्ट्री या परोपजीवी मित्रकिडीची अंडी असलेले कार्ड (१.५ लाख अंडी/ हे.) शेतामध्ये प्रसरित करावे. ५. मोठ्या प्रमाणात गुलाबी बोंडअळीचे पतंग अडकविण्यासाठी ८ ते १० कामगंध सापळे प्रतिहेक्टरी लावावे. एका महिन्यानंतर सापळ्यातील ल्यूर नवीन लावावे. ६. ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. ७. २५ पक्षिथांबे प्रतिहेक्टरी उभारावेत. ■